# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रसेनोट क्र- १११-२३ दिनांक ०६/०४/२०२३

## रुपेश ऑर्केस्ट्रा बार या आस्थापनेवर अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर पथकाची कारवाई.

दिनांक ०४.०४.२०२३ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, रुपेश ऑर्केस्ट्रा बार, गाळा नं. २७, पहिल्या माळा, किर्ती इस्टेट बिल्डींग, भाईंदर रेल्वे स्टेशन समोर भाईंदर (पूर्व) या बार आस्थापनेच्या हॉलमध्ये महिला सिंगरच्या नावाखाली परवाना नसतांना सदर बारचे चालक/मालक, मॅनेजर, कॅशिअर, स्टीवर्ड, वेटर, वादक, सिंगर मुलींना नृत्य करण्यास प्रोत्साहीत करुन त्याचंकडुन अश्लिल नृत्य करुन घेतात.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर चे पो.नि. श्री. समीर अहिरराव यांनी कायदेशीर बाबीची पुर्तता करुन बोगस गि-हाईक पाठवून सत्यता पडताळुन रुपेश ऑर्केस्ट्रा बार, भाईंदर पूर्व या ठिकाणी पोलीस पथक व दोन पंचासह दि.०५.०४.२०२३ रोजी ००.२८ वा. छापा कारवाई केली असता रुपेश ऑर्केस्ट्रा बार आस्थापनामध्ये हिंदी गाण्याच्या व वाद्याच्या तालावरती महिला सिंगर अश्लिल नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले. तसेच ऑर्केस्ट्रा बारचे चालक, मॅनेजर कम कॅशियर, वेटर, स्टीवर्ड, पुरुष सिंगर व वादक हे बारमधील महिला सिंगर यांना अश्लिल नृत्य करण्यास बंदी असताना नृत्य करण्यास भाग पाडुन प्रोत्साहित करीत असताना मिळुन आल्याने रोख रक्कम ३१,०००/- रु व २१ पारदर्शक प्लॅस्टीक रोल त्यामध्ये १० रु दराच्या खेळण्यातील हुभेहुभ दिसणारे नोटाचे रोल, चित्रीकरण केलेली क्लीप जप्त करुन नमुद ऑर्केस्ट्रा बार आस्थापनेचा मॅनेजर कम कॅशिअर-०१, वेटर-०३, स्टीवर्ड-१, पुरुष सिंगर-१ व वादक-०१ असे एकुण ०७ इसमांना ताब्यात घेण्यात आले तसेच पाहिजे आरोपी रुपेश बारचा चालक व मालक, तपासात निष्पन्न होणारे इतर चालकांविरुध्द स.फौ. उमेश पाटील यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन नवघर पोलीस ठाणते गुन्हा रजि. नं. २४६/२०२३ महाराष्ट्र हॉटेल, उपगृहे आणि मद्यपान कक्ष (बाररुम) यामधील नृत्य व अश्लिल नृत्यावर प्रतिबंध घालण्याबाबत व (त्यामध्ये काम करणा-या) महिलांच्या प्रतिष्ठेचे संरक्षण करण्याबाबत अधिनियम -२०१६ चे कलम ३, ८ (१) (२) प्रमाणे दि.०५.०४.२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि. श्री. समीर अहिरराव, स.फौ. उमेश पाटील, चा.पो.हवा. सम्राट गावडे, म.पो.अंम. अश्विनी भिलारे, महिला म.सु.ब. अर्पणा गायकवाड, सर्व नेम. अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष,भाईंदर यांनी केली आहे.

-----oooo-----